# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १६३, १६४/२०११-१२/ दिनांक :

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. शंकर विठोबा जाधव,<br>मु.पो. कोसारी, ता. जत, जि. सांगली. | अर्जदार |
| २) | श्री. पांडुरंग रावसो भोसले,<br>मु.पो. कोसारी, ता. जत, जि. सांगली. | |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडळ कार्यालय, सांगली | विरुध्द पक्षकार |
| २) | कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली | |
| ३) | सहाय्यक अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, जत, जि. सांगली | |

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**संयुक्त न्याय निर्णय**

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. शंकर विठोबा जाधव, व श्री. पांडुरंग रावसो भोसले, मु.पो. कोसारी, ता. जत, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी जत उप विभाग विरुध्द तक्रार दि. १५.२.२०१२ रोजी दाखल केली.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

या दोन्ही तक्रारी एकत्रितरित्या निकाली काढणेत येत आहेत, कारण दोन्ही ग्राहक एकाच गावातील व एकाच उप विभागातील आहेत. दोन्ही तक्रारीतील मागणी शेतीपंपास वीज जोडणी मिळावी ही असून वि.प.चा बचावही सारखाच आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

केस क्र. १६३/११-१२

श्री. शंकर विठोबा जाधव यांनी आपली शेत जमीन गट क्र. २८३ येथे नवीन शेतीपंप वीज जोडणी मिळावी यासाठी चलन रु. ४०००/- दि. ८.८.२०११ रोजी पावती क्र. ८७५८३३९ नुसार भरले आहे. चाचणी अहवाल दि. ८.८.२०११ रोजी दिलेला आहे. वितरण वाहिनीचा विस्तार असल्याने दि. ७.११.२०११ पर्यंत विद्युत पुरवठा मिळणे आवश्यक होते, तो आजतागायत मिळाला नाही. ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे दि. ५.१२.२०११ ला तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाने कुठलेही आदेश पारीत केले नाहीत. मंचाकडून अपेक्षित मदत - परवानेधारकाला एका निश्चित कालावधीत कृती मानके पूर्ण करण्याचे मंच आदेश देऊ शकते. त्यामुळे एका निश्चित कालावधीत वीज जोडणी देणे बाबत आदेश वि.प.स द्यावेत. ग्राहकाने तक्रारीसोबत चलन भरल्याची पावती जोडली आहे.

केस क्र. १६४/११-१२

श्री. पांडुरंग रावसो भोसले यांनी आपली शेत जमीन गट क्र. ३०७ येथे नवीन शेतीपंप वीज जोडणी मिळावी यासाठी चलन रु. ४०५०/- दि. ८.८.२०११ रोजी पावती क्र. ८७५८३३८ नुसार भरले आहे. चाचणी अहवाल दि. ८.८.२०११ रोजी दिलेला आहे. वितरण वाहिनीचा विस्तार असल्याने दि. ७.११.२०११ पर्यंत विद्युत पुरवठा मिळणे आवश्यक होते, तो आजतागायत मिळाला नाही. ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे दि. ५.१२.२०११ ला तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाने कुठलेही आदेश पारीत केले नाहीत. मंचाकडून अपेक्षित मदत - परवानेधारकाला एका निश्चित कालावधीत कृती मानके पूर्ण करण्याचे मंच आदेश देऊ शकते. त्यामुळे एका निश्चित कालावधीत वीज जोडणी देणे बाबत आदेश वि.प.स द्यावेत. ग्राहकाने तक्रारीसोबत चलन भरल्याची पावती जोडली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. १०.४.२०१२ च्या लेखी अहवालात तक्रारदारांनी शेतीपंप वीज जोडणीसाठी दि. ८.८.२०११ ला चलन भरल्याचे व त्याचदिवशी चाचणी अहवाल दिल्याचे मान्य केले आहे. परंतु चाचणी अहवालाप्रमाणे जागेची तपासणी केली असता जागेवर मोटारपेटी व मोटर नाही असे आढळले आहे. असे असले तरी, वि.प.कडे ज्या ग्राहकांनी दि. ३१.३.२०११ पूर्वी चलन भरलेले आहे व चाचणी अहवाल सादर केलेले आहेत अशा ग्राहकांची कामे दि. ३१.३.२०१२ पर्यंत पूर्ण करण्याचे वरिष्ठ कार्यालयाचे आदेश आहेत. दि. ३१.३.२०११ च्या अगोदर चलन भरलेले एकूण ६७ अर्जदारांचे लाईन ओढून कनेक्शन देणे बाकी आहे. तसेच दि. ३१.३.२०११ नंतर चलन भरुन प्रलंबित यादी एकूण ४३४ आहे. त्यामध्ये श्री. जाधव (केस क्र. १६३) यांचे जेष्ठता यादीमध्ये नांव १७६ क्रमांकावर व श्री. भोसले (केस क्र. १६४) यांचे १७५ क्रमांकावर आहे.

This document was created using Smart PDF Creator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

या दोन्ही तक्रारदारांच्या पूर्वीच्या अर्जदारांचे काम पूर्ण झाल्यानंतर त्यांचे काम हाती घेवून कनेक्शन देण्यात येईल. ग्राहकाची भरपाईची मागणी मान्य करण्यात येवू नये, कारण कृती मानके विनियम २००५ कलम १२.२ नुसार कृती मानकांमधील कमतरता दूर करण्यात आली नसल्यामुळे भरपाईचा कालावधी निश्चित होत नाही असा बचाव घेतला आहे.

प्रस्तुत तक्रारींची सुनावणी दि. १२.४.२०१२ ला घेण्यात आली. त्यावेळी तक्रारदार गैरहजर, प्रतिनिधी नेमले नाहीत.वि.प.तर्फे नोडल ऑफीसर श्री. क्षीरसागर, कनिष्ठ अभियंता श्री. एस.वाय. पाटील, कनिष्ठ अभियंता श्री. कुलकर्णी उपस्थित. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी दि. ३१.३.२०११ पूर्वी चलन भरलेल्या व चाचणी अहवाल सादर केलेल्या ग्राहकांची कामे दि. ३१.३.२०१२ पर्यंत पूर्ण करण्याचे वरिष्ठ कार्यालयाचे आदेश असल्याने या दोन्ही ग्राहकांना वीज जोडणी दि. १.४.२०१२ नंतर जेष्ठतायादीनुसार देण्यात येईल असे मंचासमोर सांगितले.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) ग्राहकाची वीज जोडणी एका निश्चित कालावधीत व्हावी ही मागणी मंजूर करणे योग्य व कायदेशीर होईल काय ?

उत्तर : होय

कारणमिमांसा

उभयबाजूंच्या कथनानुसार या दोन्ही ग्राहकांनीशेतीपंप नवीन वीज जोडणीसाठी दि. ८.८.२०११ रोजी चलन भरले व त्याचदिवशी चाचणी अहवाल दिलेले आहेत. कृती मानके विनियमातील तरतुदी-प्रमाणे वितरण वाहिनीचा विस्तार असल्याने ३ महिन्याचे मुदतीत म्हणजे दि. ७.११.२०११ पर्यंत वीज जोडणी मिळणे आवश्यक होते, ती अद्याप झालेली नाही. अंतर्गत कक्षाने कुठलेही आदेश केले नाहीत.

वि.प.ने आपल्या लेखी अहवालात ज्या ग्राहकांनी दि. ३१.३.२०११ पूर्वी चलन भरलेले आहे व चाचणी अहवाल सादर केले आहेत अशा ग्राहकांची कामे दि. ३१.३.२०१२ पर्यंत पूर्ण करण्याचे वरिष्ठ कार्यालयाचे आदेश आहेत असे म्हटले आहे. ग्राहकांच्या जागेची तपासणी केली असता जागेवर मोटारपेटी व मोटर नाही असे आढळले आहे. परंतु त्याबद्दल तपासणी अहवाल सादर केला नाही किंवा ग्राहकांना जागेची पहाणी करण्यासाठी नोटीस दिली होती हे स्पष्ट केले नाही. कलम ४३ विद्युत कायदा २००३ व कृती मानके विनियम २००५ मधील तरतुदीनुसार ग्राहकाने वीज मागणी केल्यानंतर त्यांस विद्युत पुरवठा करणे परवानेधारकावर बंधनकारक ती त्यांची जबाबदारी आहे. अर्जदार ग्राहकांनी चलन भरुन चाचणी अहवाल दिले आहेत. वितरण वाहिनीचा विस्तार असलेने कृती मानकानुसार ३ महिन्यात ग्राहकांना वीज जोडणी देण्यात आलेली नाही हे स्पष्ट होते. कृती मानके विनियमतील तरतुदींची पूर्तता करण्यात वितरण कंपनी अपयशी ठरली आहे. वि.प.ने दिलेली कारणे संयुक्तिक वाटत नाहीत. वि.प.च्या लेखी अहवालातील म्हणण्यानुसार ग्राहकांचे जेष्ठता यादीतील क्रमांक १७५ व १७६ आहेत, परंतु दि. ३१.३.२०१२ पर्यंत किती अर्जदार ग्राहकांची वीज जोडणी झाली व दि. १.४.२०१२ ला किती अर्ज प्रलंबित आहेत याचे स्पष्टीकरण दिले नाही.

This document was created using Smart PDF Creator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

असे असले तरी, विद्युत कायदा २००३ व कृती मानकानुसार ग्राहकास वि.प.ने वीज जोडणी देणे आवश्यक आहे. प्रस्तुत ग्राहकांना वीज जोडणी न दिल्याबद्दल कुठलेही स्पष्टीकरण किंवा तांत्रिक अडचणी वि.प.ने मंचासमोर मांडल्या नाहीत. वि.प.चे नोडल ऑफीसर यांनी या ग्राहकांना त्यांचे शेतीपंपास दि. १५.६.२०१२ पर्यंत वीज जोडणी देण्याचे मंचासमोर मान्य केले आहे. ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००६ मधील कलम ८.२ नुसार मंच ग्राहकाचे गाऱ्हाणे ठराविक मुदतीत दूर करण्याचे आदेश देऊ शकते. या ठिकाणी वि.प.च्या अधिकाऱ्यांनी ग्राहकास दि. १५.६.२०१२ पर्यंत वीज जोडणी देतो असे मंचासमोर सुनावणीचेवेळी सांगितले. मुद्दा क्र.१ चे उत्तर होय असे देण्यात येत आहे. खालील प्रमाणे आदेश -

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनी जत उप विभाग यांनी मंचासमोर कबूल केल्याप्रमाणे या दोन्ही ग्राहकांना दि. १५.६.२०१२ पर्यंत त्यांनी मागणी केलेल्या शेत जमीन गट क्रमांकामध्ये शेतीपंप वीज जोडणी द्यावी व त्याचा पूर्तता अहवाल मंचास द्यावा.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे-पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com